# निषेध मोर्चा : सकल हिंदू समाज एकवटला

## बांगलादेशात हिंदूंवरील अत्याचाराच्या निषेध

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.10 )-** बांगलादेशात हिंदूंवर होणाऱ्या अमानुष अत्याचाराच्या निषेधार्थ अमरावती येथे सकल हिंदू समाजातर्फे निषेध मोर्चाचे आयोजन करण्यात आले होते. इस्कॉनचे संत चिन्मय कृष्ण प्रभू दास यांची बांगलादेशात केलेली अटक व हिंदूंवरील होणाऱ्या अत्याचार व सुरक्षेच्या प्रश्नांना वाचा फोडण्यासाठी हजारोंच्या संख्येत अमरावतीकर नागरिक रस्त्यावर उतरले होते.

यावेळी उपस्थित संतांसह मान्यवरांनी जयस्तंभ चौकातील महात्मा गांधीच्या पुतळ्याला माल्यार्पण करून निषेध मोर्चाला सुरवात केली. रॅली जयस्तंभ चौकातून ,सरोज चौक मार्गे श्याम चौकातून राजकमल चौकात आली. राजकमल चौकात उपस्थित प्रचंड जनसमुदायाला प्रमुख व्यक्त्यानी यावेळी संबोधित केले. निषेध मोर्चाला जनतेने प्रचंड प्रतिसाद दिल्याने शहरात हिंदू एकतेची शक्ती लक्षणीयरित्या दिसून आली. संपूर्ण शहरातील हिंदुत्ववादी वातावरण बघता सकल हिंदू समाज बांगलादेशी हिंदूंच्या पाठीशी ठामपणे उभा आहे,असा निर्धार उपस्थितांनी व्यक्त केला. याबाबत शिष्टमंडळाने कलेक्टर ऑफिसमध्ये नागरिकांच्या स्वाक्षरीचे निवेदन दिले.





जिल्हाधिकाऱ्यांच्या अनुपस्थितीत तहसीलदार निलेश खटके यांना हे निवेदन सुपूर्द करण्यात आले. प. पू. संदीप मुनी जैन महंत, प.पू. संत राजेशलाल साहेब, प.पू.नित्य हरिनाम प्रभुजी इस्कॉन, ह .भ. प.ज्ञानेश्वर महाराज पातशे तसेच विश्व हिंदू परिषदेचे विभाग संघटनमंत्री बंटी पारवानी मंचावर उपस्थित होते. मुख्य वक्ता म्हणून नागपूर येथील धरमपेठ महाविद्यालयातील इतिहासाचे प्राध्यापक प्रा. डॉ सतीश चाफले, तसेच नागपूर विद्यापीठात




विविध प्राधिकरणावरील सदस्य उपस्थित होते. हजारो वर्षांच्या हल्ल्यानंतर सुद्धा हिंदू संघर्ष करत राहिला; परंतु आज बांग्लादेशात हिंदूंच्या अस्तित्वाचा प्रश्न निर्माण झाला आहे. त्यामुळे आज हिंदू रस्त्यावर उतरला आहे. बांगलादेशी सरकारने कट्टरपंथी लोकांना थांबवावे अन्यथा हिंदू समाजाच्या रोषाला सामोरे जावे लागेल, असा निर्वाणीचा इशारा त्यांनी यावेळी दिला. बंटी पारवानी यांनी बांगलादेशातील हिंदू समाजाची व्यथा अमरावतीकर नागरिकांसमोर मांडली. तसेच बांगलादेशातील हिंदू ,जैन,शीख,बौद्ध व इतर सर्व अल्पसंख्यांक नागरिकांना न्याय मिळवून देण्यासाठी सरकारला आवाहन केले. अमरावती शहरातील सर्व हिंदू संघटनांचे कार्यकर्ते, लोकप्रतिनिधी तसेच मान्यवर नागरिक प्रचंड संख्येने बांगलादेश येथील हिंदूंना समर्थन देण्यासाठी उपस्थित होते. शहरातील विविध राजकीय, सामजिक, शैक्षणिक,अध्यात्मिक तसेच विविध महिला संघटनांचे नेते व कार्यकर्तेदेखील लक्षणीय संख्येने उपस्थित होते. यावेळी यावेळी आ. प्रताप अडसड, आ. राजेश वानखडे, आ. केवलराम काळे, माजी खा. नवनित राणा, माजी आ. जगदिश गुप्ता, प्रविण पोटे, जयंत डेहनकर, शिवराय कुळकर्णी, रवींद्र खांडेकर, चेतन पवार, प्रशांत शेगोकार, सतीश करेसिया, विवेक कलोती, अनिता राज, सुरेखा लुंगारे , गंगाताई खारकर, सह सर्व भाजपा पदाधिकारी कार्यकर्ते मोर्चात सहभागी झाले होते.

## धामणगातही आक्रोश मोर्चा; दुपारपर्यंत स्वयंस्फूर्त बंद




**धामणगाव रेल्वे -** बांगलादेशातील हिंदू संतांवर तेथील सरकार अतोनात अत्याचार करित आहेत बांगलादेश मध्ये हिंदू पूर्णपणे असुरक्षित झालेला आहे. तेथील महिलावर दिवसाढवळ्या अत्याचार करण्याचे कार्य बांगलादेशातील लोक करीत आहेत असुरक्षित असलेल्या हिंदूंना सुरक्षित करण्यात यावे आणि बांगलादेशाचा कठोर निषेध करण्याकरिता मंगळवारी धामणगाव रेल्वे येथे युवकांची आक्रोश मोर्चा काढण्यात आली. सकल हिंदू समाज, बजरंग दल व राष्ट्रीय गोरक्षा मंचाचे शेकडो कार्यकर्ते रॅलीमध्ये सहभागी झाले. छत्रपती शिवाजी चौक ते मुख्य बाजार ओळ, गांधी चौक, अमर शहीद भगतसिंग चौक मार्गे रॅली तहसील कार्यालयात पोहोचली. या ठिकाणी तहसीलदारांना धामणगाव इस्कॉनचे प्रमुख दिनेश बुधलानी व विवेक विचार मंचाचे जिल्हाप्रमुख प्रशांत मून यांच्या हस्ते निषेधाचे निवेदन सादर करण्यात आले.

### शांतता नोबेल पुरस्कार परत घेण्यात यावे

बांगलादेशात सामान्य हिंदूंवर सुद्धा सातत्याने अत्याचार होत आहे. बांगलादेश आता इस्लामी कट्टरतावादाकडे वेगाने सरकत आहे. या सर्व घटनांचा निषेध करण्यासाठी सकल हिंदू समाजाच्यावतीने भव्य मोर्चा छत्रपती शिवाजी महाराज चौक ते तहसील कार्यालयापर्यंत काढण्यात आला. बांगलादेशात सध्या सत्तेवर असलेले मोहम्मद गुनूस यांना शांततेचे नोबेलही मिळाले आहे. हिंदूच्या कतली करण्यासाठी मोहम्मद युनुस यांना शांततेचे नोबेल पारितोषिक मिळाले आहे का? असा प्रश्न उपस्थित करून युनुस यांचे शांतता नोबेल पुरस्कार परत घेण्यात यावे,अशी मागणी सुद्धा करण्यात आली ते सत्तेत आल्यापासून बांगलादेशात हिंदूवर सातत्याने हल्ले होत असल्याचा उल्लेख निवेदनात करण्यात आला आहे.

### दुपारपर्यंत प्रतिष्ठाने व दुकाने स्वयंस्फूर्त बंद

सकल हिंदू समाजाच्या विनंतीवरून धामणगावच्या समस्त व्यापाऱ्यांनी मंगळवारी सकाळपासून दुपारपर्यंत स्वेच्छेने आपली प्रतिष्ठाने व दुकाने बंद ठेवून निषेध व्यक्त केला. सकल हिंदू समाजाच्या विनंतीचा मान ठेवून समस्त धामणगावकरांनी शंभर टक्के दुकाने बंद ठेवलीत. त्यामुळे यावेळी सकल हिंदू समाजाच्या कार्यकर्त्यांनी व्यापारांचे आभार व्यक्त केले.

## परतवाडा-बुराडघाट मार्गावर दुचाकीची समोरासमोर धडक, दोघांचा मृत्यू

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.10 ) -** परतवाडा पोलीस ठाण्याअंतर्गत येणाऱ्या मल्हारा-बुराडघाट मार्गावर दोन दुचाकीच्या भीषण अपघातात दोघांचा जागीच मृत्यू झाला. दुचाकीस्वारांची समोरासमोर धडक होऊन मंगळवारी (दि.10) हा अपघात झाला.या घटनेने परिसरात शोककळा पसरली आहे.



माहितीनुसार, घाटलाडकी येथील गजानन तुकाराम शनवारे (वय 35 वर्षे) हे त्यांच्या दुचाकीवरून (क्रमांक एमएच 27 बीए 7849) परतवाड्याकडे जात होते. तर भुलोरी येथील अजय श्यामलाल जामुनकर हे त्यांच्या मोटारसायकलने (क्रमांक एमएच 27 डीएफ 0136) भुलोरीकडे एका अंतिम संस्कारासाठी जात होते. दोन्ही दुचाकींचा वेग जास्त असल्याने श्रीकृष्ण मंदिराजवळील वळणावर त्यांची समोरासमोर धडक झाली.ही धडक एवढी भीषण होती की, दोन्ही दुचाकीस्वारांचा जागीच मृत्यू झाला. मल्हारा चे सरपंच अनिल अकोले यांनी तत्काळ अचलपूर उपजिल्हा रुग्णालय व परतवाडा पोलीस ठाण्याच्या रुग्णवाहिकेला अपघाताची माहिती दिली. माहिती मिळताच रुग्णवाहिका आणि पोलिसांचे पथक तातडीने घटनास्थळी पोहोचले. दोन्ही मृतांना शवविच्छेदनासाठी अचलपूर उपजिल्हा रुग्णालयात नेण्यात आले. या अपघातामुळे घाटलाडकी व भुलोरी गावात शोककळा पसरली आहे. घटनेचा पुढील तपास परतवाडा पोलीस करीत आहे. अपघाताचे नेमके कारण आणि इतर बाबींचा देखील कसून तपास सुरू आहे.

## योजनांच्या उद्दिष्टपूर्तीसाठी प्रभावी नियोजन करा!

### विभागीय आयुक्त डॉ. निधी पाण्डेय ■ टास्क फोर्स समितीची सभा

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि. 10 )-** शासनाव्दारे राबविण्यात येणाऱ्या विविध लोकहितकारी योजनांच्या उद्दिष्टपूर्तीसाठी प्रभावी नियोजन करुन विहित मुदतीत विकासकामे पूर्ण होण्यासाठी सर्वंकष प्रयत्न करावे, असे निर्देश विभागीय आयुक्त डॉ. निधी पाण्डेय यांनी विभागातील जिल्हा प्रशासनाला दिले.

विभागीय आयुक्तालयाच्या सभागृहात विभागीय आयुक्त डॉ. पाण्डेय यांच्या अध्यक्षतेखाली विभागीय टास्क फोर्स समितीची सभा सोमवारी (ता.9 डिसेंबर) संपन्न झाली. त्यावेळी त्या बोलत होत्या. अमरावती विभागातील पाचही जिल्ह्यांचे जिल्हाधिकारी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, समाज कल्याण उपायुक्त सुनील वारे, आदिवासी विकास विभागाचे अपर आयुक्त सुरेश वानखेडे, कामगार विभागाचे उपायुक्त आदी दूरदृश्य प्रणालीच्या माध्यमातून तर समितीचे सचिव तथा विकास उपायुक्त राजीव



फडके प्रत्यक्षरित्या यावेळी सभेला उपस्थित होते.

डॉ. पाण्डेय म्हणाल्या की, गोर-गरीब जनतेला हक्काचा निवारा उपलब्ध व्हावा यासाठी प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत घरकुल उपलब्ध करुन दिल्या जाते. ग्रामीण व शहरी भागातील एकही पात्र लाभार्थी या योजनेच्या लाभापासून वंचित राहू नये, यासाठी संबंधित विभागांनी त्यांच्याकडील प्रलंबित घरकुलासंदर्भात आढावा घेवून ती पूर्ण होण्यासाठी प्रभावी नियोजन करावे. भूमिहीन लाभार्थींना जागा उपलब्ध करुन देण्यात यावी. अतिक्रमण नियमानुकूलची प्रक्रिया पूर्ण करण्यात यावी. नवीन लाभार्थ्यांच्या संदर्भात सर्वेक्षण, घरकुल मंजूरात व पूर्णत्वास नेण्यासाठी आवश्यक प्रक्रिया गतीने पूर्ण करण्यात यावी, असे निर्देश त्यांनी जिल्हा प्रशासनाला दिले.

या सभेत ग्रामीण भागातील पात्र भूमिहीन लाभार्थ्यांना जागा उपलब्ध करुन देणे, अतिक्रमण नियमानुकूल करणे, पंडीत दीनदयाल अर्थसहाय्य योजनेंतर्गत जागा खरेदीसाठी मदत करणे, ग्रामविकास विभाग, सामाजिक न्याय विभाग, आदिवासी विकास आदी विभागाव्दारे राबविण्यात येणाऱ्या विविध योजनेंतर्गत पात्र लाभार्थ्यांना घरकुल मंजूर करणे, मंजूर घरकुल पूर्ण करुन घेणे, अनुदान वितरीत करणे, नवीन लाभार्थ्यांसाठी सर्वेक्षण करणे इत्यादी महत्वपूर्ण मुद्दांबाबत आढावा घेण्यात आला आणि त्यानुषंगाने सविस्तर चर्चा करण्यात आली. विभागातील एकही पात्र लाभार्थी शासनाच्या कल्याणकारी योजनांच्या लाभापासून वंचित राहू नये, यासाठी संबंधित विभागप्रमुखांनी जबाबदारीपूर्वक उत्तम नियोजन करावे. तसेच योजनेंतर्गत जिल्ह्याला प्राप्त उद्दिष्टपूर्तीसाठी सर्वंकष प्रयत्न करावे, अशा सूचना विभागीय आयुक्तांनी यावेळी दिल्या.

## गौतम अदानीला अटक करा!

### भारतीय कम्युनिस्ट पक्षाची जिल्हाधिकारी कार्यालयावर निदर्शने

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती( दि.10 ) -** अमेरिकेमध्ये आर्थिक घोटाळ्याबाबत आरोपपत्र दाखल झालेल्या गौतम अदानी, सागर अदानी यांना अटक करा या प्रमुख मागणीसह इतर मागण्यांसाठी भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे वतीने आज मानवी हक्क दिनी (दि.12) देशव्यापी आंदोलन करण्यात आले. अमरावती जिल्हाधिकारी कार्यालयासमोर कार्यकर्त्यांनी जोरदार निदर्शने केली.

अमेरिकेतील गुंतवणूकदारांचे करोडो डॉलर जमा करून भारतातील ऊर्जा क्षेत्रातील अधिकाऱ्यांना दोन हजार दोनशे करोड रुपयाची लाच देत गौतम अदाणी यांनी महा घोटाळा केल्याचा आरोप यावेळी करण्यात आला. या अगोदर सुद्धा हिंडेवबर्ग रिपोर्ट




मध्ये गौतम अदानीने खोट्या सेल कंपण्या स्थापन करून प्रचंड आर्थिक घोटाळा केल्याचे उघड झाले आहे. एवढा मोठा भ्रष्टाचार उघड होऊन सुद्धा केंद्र सरकार झोपेचे सोंग घेत आहे.सरकारने त्वरित संयुक्त संसदीय समितीची स्थापना करून गौतम अदानीची चौकशी करण्याची मागणी भाकप ने केली आहे. तसेच गेल्या एका वर्षापासून मणिपूर मध्ये हिंसाचार सुरू आहे. या वांशिक हिंसाचाराला रोखण्यात मणिपूर सरकार अपयशी ठरले आहे. मणीपूरचे मुख्यमंत्री विरेन सिंह यांनी त्वरित राजीनामा देवून आदिवासी विरोधी सशस्त्र दल विशेष संरक्षण कायदा (स्न स क्क ) रद्द करावा, राष्ट्रपतींनी मणिपूर मध्ये शांतता स्थापन करण्यासाठी पुढाकार घ्यावा,अशी मागणी भाकपने केली आहे.

यावेळी केंद्र सरकारच्या विरोधात जोरदार निदर्शने करून घोषणा देण्यात आल्या. आंदोलनामध्ये भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे राष्ट्रीय कौन्सिल सदस्य तुकाराम भस्मे , पक्षाचे जिल्हा सचिव सुनील मेटकर,अशोक सोनारकर, प्रा.ओमप्रकाश कुटेमाटे जे.एम. कोठारी,नीलकंठ ढोके, चंद्रकांत वडस्कर, चंद्रकांत बानुबाकोडे, सुनिल घटाळे, विनोद जोशी, संजय मंडवधरे, डॉ.नामदेवराव बदरके, उमेश बनसोड, संतोष सुरजुसे, सतिश चौधरी, राहुल मंगळे, धनंजय मस्के, शरद मंगळे, बापुराव बाळापुरे, दिगांबर नगेकर,राजाभाऊ बाभूळकर, नारायण भगवे, भिमराव बेराड, किसनराव चौधरी, सुरेश शंभरकर, प्रफुल देशमुख, अविनाश कणसे, उद्धवराव कणसे, हरीदास राजगिरे, मनोहर वाढोणकर, ओमप्रकाश ज्ञानेश्वर मेश्राम, नंदू नेतनराव, मंगला भोगे, सविता इंगोले, धम्मा खडसे, हरिदास चरपे, दामोधर पवार, प्रकाश तनपुरे, अशोक इंगळे, गजानन हिवरे, सिताराम कंठाळे इत्यादींची उपस्थिती होती.

### ईव्हिएम ऐवजी बॅलेटवर निवडणुका घ्या-

ईव्हिएम मशिन विरोधात देशभर आंदोलन सुरू आहे. मतदान प्रक्रियेतील अनेक संशयास्पद बाबी महाराष्ट्र व इतर राज्यातील अलिकडे झालेल्या निवडणूकीतून पुढे आल्या आहेत. पारदर्शी व विश्वासपात्र निवडपूक प्रक्रियेसाठी श्वङ्करूचा वापर त्वरीत बंद करून पूर्वी प्रमाणे बॅलेट पेपरवर निवडणूका घेण्याची मागणी भाकपने केली आहे. शेतकऱ्यांसाठी हमीभावाचा ( रूस्क )कायदा करून शेतकऱ्यांना न्याय द्यावा इत्यादी मागण्याचे निवेदन जिल्हाधिकारी यांचे मार्फत राष्ट्रपती यांना पाठवण्यात आले.



## चायना मांजावर कारवाई, एकाला अटक

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.10 ) -** शहर पोलीस आयुक्त यांनी शहरात नायलॉन मांजा प्रतिबंधीत केला असून मांजा खरेदी,विक्री व जवळ बाळगण्यार्यावर कारवाई करण्याचे आदेशीत केले होते. त्यानुसार दि. 9 डिसेंबर रोजी गोपनिय माहितीच्या आधारे फ्रेजरपुरा पोलिसांनी श्रीकृष्ण अपॉटमेन्ट येथे एकावर कारवाई केली आहे. आरोपीकडून चायना मांजा सह एकूण 12 हजार 500 रूपयांचा मुद्देमाल पोलिसांनी जप्त केला. मिळालेल्या माहितीनुसार, संशयीत रूपेश जनार्धन दिवान (वय 40,रा.श्रीकृष्ण अपॉटमेन्ट योगायोग कॉलनी) हा त्याचे राहते घरून जय गुरुकृपा जनरल स्टोअस नावाच्या दुकानातुन पतंग, नायलॉन मांजा विक्री करीत असल्याची गोपनीय माहिती फ्रेजरपुरा पोलिसांना मिळाली होती. त्या आधारे पोलिस पथकाने सदर ठिकाणी धाड टाकली. संशयीताचे ताब्यातुन अवैध चायना / नायलॉन मांजा, मोनो के.टी.सी. फायटर 6 नग, गोल्ड कंम्पनीचे लेबल असलेले 4 रील, चक्रीला गुंडाळलेला हिरव्या व पिवळया रंगाची चायना मांजाची चक्री, असा एकुन 12,500 रूपयांचा मुददेमाल ताब्यात घेतला. आरोपीविरूध्द भारतीय न्याय सांहिता, कलम 223, सह कलम 5 पर्यावरण सरंक्षण कायदा 1986 प्रमाणे गुन्हा दाखल करण्यत आला. ही कारवाई पोलीस आयुक्त नवीनचंद्र रेड्डी, पोलीस उपायुक्त सागर पाटील, सहा. पोलीस आयुक्त कैलास पुंडकर यांच्या मार्गदर्शनाखाली फ्रेजरपुरा पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक निलेश करे, पोलीस उप निरीक्षक राहुल महाजन, पोलीस हवालदार सुभाष पाटील, शशिकांत गवई, सचीन बोरकर, सागर चव्हाण, जावेद पाटेल यांनी केली.

**12500 रूपयांचा मुद्देमाल जप्त**

आरएनआय ४६९७५/१९८५ महासागर अमरावती

मालक, मुद्रक, प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर १८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक, अमरावती येथे प्रकाशित केले. संपादक -श्रीकृष्ण तनसुखदास चांडक ( पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर राहील ) अमरावती मुख्य कार्यालय, पत्ता. दैनिक महासागर, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक अमरावती, फोन नं. ९५१८९३४५०४

# कापुस विक्री : शेतकऱ्यांचे ‘वेट अँड वॉच’

## सीसीआयकडून कापसाला 7450 रुपयांपर्यंत भाव



**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती,( दि.10 )** - शेतकऱ्यांचे पांढरं सोनं असलेल्या कापसाला खुल्या बाजारात क्विंटलमागे 7100 तर सीसीआयच्या खरेदी केंद्रांवर 7450 रुपयांपर्यंत भाव मिळत आहे. रुई आणि सरकीच्या भाव आंतरराष्ट्रीय स्तरावर माधारले आहेत. त्यामुळे तूर्तास भाववाढीची शक्यता नाही. परदेशात कापसाची निर्यात थांबली आहे. अशा परिस्थितीत दरवाढीच्या प्रतीक्षेत शेतकरी कापसाची साठवणूक करुन ‘वेट अँड वॉच’ वर जोर देत आहे.

जिल्ह्यात कॅश क्रॉप म्हणून कापसाची ओळख आहे. किंबहुना खरीप हंगामात कपाशीचा पेरा सरासरी क्षेत्राच्या 50 टक्क्यांपर्यंत आहे. यावर्षी जिल्हाभरात सरासरीपेक्षा जास्त पाऊस, अतिवृष्टीमुळे कपाशीच्या पिकाचे नुकसान झाले. किंबहुना देशभरात हीच स्थिती असल्याने कापसाचे सरासरी उत्पादनात कमी येत आहे. त्यातच कापसाचा उत्पादन खर्च दरवर्षी वाढत आहे. बियाणे, रासायनिक खते, कीटकनाशके यांची दरवर्षी होत असलेली दरवाढ सोबतच कापूस वेचणीचा दर 10 रुपये किलोवर गेल्याने उत्पादनखर्चात वाढ होत असताना त्या तुलनेत मार्केटमध्ये भाव नाही. कापसाला सध्या उठावच नसल्याने खुल्या बाजारात आवक थंडावली आहे. थोडीफार आवक सीसीआयच्या केंद्रांवर होत आहे. तिथेही आठ टक्के आर्द्रतेच्या निकषात हमीभावापेक्षा क्विंटलमागे 50 ते 100 रुपये कमी मिळत आहेत. परंतु खासगी खरेदीपेक्षा किमान क्विंटलमागे 300 ते 400 रुपये जास्त मिळत असल्याने अडचणीतील शेतकरी कापूस विक्रीसाठी आणत आहेत किंवा खेडा खरेदीत देत आहेत. यामध्ये शेतकऱ्यांची लूट होत आहे.

उर्वरित शेतकरी दरवाढीच्या प्रतीक्षेत साठवणूक करीत असल्याने सध्या शेतकऱ्यांचे पांढरे सोने मातीमोल झाले आहे. बांगलादेशात गारमेंटचा मोठा उद्योग असल्याने भारताकडून कापूस आयात केला जातो. सध्या तेथील राजकीय अस्थिरतेमुळे भारतातून होणारी निर्यात थांबली आहे. याचा फार मोठा फटका कापूस उद्योगाला बसला आहे. बांगलादेशात किमान 15 ते 16 लाख व चीनमध्ये 10 ते 12 लाख गाठींची निर्यात व्हायची, यंदा निर्यात बंद असल्याने कापसाला उठाव नसल्याचे वास्तव आहे.

### देशांतर्गत गाठीचा भाव 52 ते 53 हजार

आंतरराष्ट्रीय बाजारात रुईचा 70 सेंट पर पाउंड (450 ग्रॅम) असा भाव आहे. देशांतर्गत गाठीचा 52 ते 53 हजारांपर्यंत (175 किलो) भाव मिळत आहे. शिवाय सरकीलादेखील देशांतर्गत 3200 ते 3300 रुपये क्विंटल भाव आहे. या दरावरच सध्या बाजारभाव स्थिरावला आहे. त्यामुळे कापसाच्या दरात वाढ झालेली नसल्याची माहिती व्यापारी सूत्रांनी दिली.

# भानखेड-उदखेड रस्त्याचे निर्माणकार्य रखडले

## सा.बां.विभागाचे दुर्लक्ष ■ नागरिक त्रस्त





**महासागर प्रतिनिधी**
**अंजनगाव बारी, ( दि.10 )**- बडनेरा मतदार संघातील अंजनगाव बारी सर्कलमधील ग्रामीण भागातील भानखेड (बु.) ते उदखेड रस्त्याचे काम 28 एप्रिल 2024 पासून सुरू आहे, रस्त्याचे काम पुर्ण झाले असुन भानखेड (बु.) ते उदखेड या दोन गावांच्या मधोमध असलेल्या 3 कि.मी. रस्त्याचे काम गेल्या आठ महिन्यांपासून अर्धवट राहीले आहे. रस्त्यावर गिट्टी पडून असुन वाहतुकीस तसेच ये-जा करणाऱ्या नागरिकांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे.

प्रवास करताना गिट्टीवर वाहने घसरून किरकोळ अपघाताचे प्रमाण वाढले आहे. या रस्त्याने नागरीक, शेतकरी व विद्यार्थ्यांना प्रवास त्रासदायक ठरत आहे. या नादुरुस्त रस्त्याकडे सार्वजनिक बांधकाम विभागाचे दुर्लक्ष होत आहे.

हा तीन किलोमीटरचा रस्ताच का रखडला ? याकडे शंका उपस्थित केल्या जात आहे. रस्त्याच्या नुतनीकरणासह डांबरीकरणाची मागणी गावातील नागरिकांनी संबंधीत विभागाकडे रेटून धरली असल्याचे समजते.

# मोथा गावात जंतनाशक गोळ्यांचे वाटप

## वंचित विद्यार्थ्यांना 10 डिसेंबर रोजी पुन्हा गोळ्या होणार वितरण



**महासागर प्रतिनिधी**
**चुरणी,( दि.10 )** - जंतामुळे बालकांमध्ये आणि किशोरवयीन मुला-मुलींमध्ये अनिमियासह पोटाच्या विविध आजारांना सामोरे जावे लागते त्या पार्श्वभूमीवर जंतनाशक गोळी देण्याची विशेष मोहीम राज्याच्या आरोग्य विभागाकडून राबविली जाते. त्यानुसार दि.4 डिसेंबर रोजी मोथा गावात जंतनाशक गोळ्याचे वाटप करण्यात आले. यावेळी मोथा उपकेंद्राच्या वैद्यकीय अधिकारी डॉ.नीता नागले, आरोग्य सहायक अशोक सुरत्ने, आरोग्य सेवक प्रवीण निंभोरकर, आरोग्य सेविका प्रविणा धाकडे, हिना सौदागर, तालुका निरीक्षक शेवंता खडके, आशा सुपरवायझर निगार शेख, आशा सेविका शेवंता शेळके, अंगणवाडी सेविका झीमाय मोरले, अनिता कासदेकर उपस्थित होत्या. जंतामुळे बालकांमध्ये व किशोरवयीन मुला-मुलींमध्ये अनिमिया, पोटदुखी, उलट्या, अतिसार, मळमळ, भूक मंदावणे यासह कुपोषण, वाढ खुंटणे आदी आजारांचा धोका असतो त्या पार्श्वभूमीवर जंतनाशक गोळी देण्याची विशेष मोहीम राज्याच्या आरोग्य विभागाकडून राबविली जाते. त्यानुसार ता. 4 डिसेंबर रोजी मोथा गावात मोहिम पार पडली, तर वंचित विद्यार्थ्यांना 10 डिसेंबर रोजी पुन्हा गोळ्या वाटप होणार आहे. या मोहिमेतून मुला, मुलींचे आरोग्य चांगले होऊन पोषण स्थिती, शिक्षण व जीवनाचा दर्जा उंचावण्यास मदत होते. जागतिक आरोग्य संघटनेच्या मार्गदर्शनानुसार प्रादुर्भाव रोखण्यासाठी जंतनाशक मोहिमा घेतल्या जातात. 1 ते 19 वर्षे वयोगटातील सर्व मुलामुलींना जंतनाशक गोळी देऊन त्यांचे आरोग्य चांगले ठेवणे, पोषण स्थिती, शिक्षण व जीवनाचा दर्जा उंचावणे हाच मोहिमेचा मुख्य उद्देश आहे.

> मुलांच्या आरोग्यासाठी राष्ट्रीय जंतनाशक मोहीम 4 डिसेंबर रोजी राबविण्यात आली. मात्र काही कारणास्तव वंचित विद्यार्थ्यांसाठी पुन्हा 10 डिसेंबर रोजी मोहीम राबविण्यात येणार आहे.
>
> **डॉ.नीता नागले,**
> **वैद्यकीय अधिकारी,**
> **उपकेंद्र मोथा.**

## किशोर खाकोले यांचे निधन



**चांदूर रेल्वे** - शहरातील प्रतिष्ठित व्यापारी मंगलम मेडीकल व अंकुर मेडीकल चे संचालक अंकुर खाकोले यांचे वडील किशोर गजानंद खाकोले यांचे वयाच्या 72 वर्षी मंगळवार 10 डिसेंबर रोजी सकाळी दुघर्टनेत दु:खद निधन झाले. त्यांची अंतिम यात्रा मंगळवार 10 डिसेंबर ला जुना सरकारी दवाखान्या जवळील निवासस्थानी वरून सायंकाळी 7 वाजता काढण्यात आली. चांदूर रेल्वे येथील हिंदू स्मशान भूमीत त्यांचेवर अंतिम संस्कार पार पडले.

# महात्मा फुले हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालयात महापरिनिर्वाण दिन





**महासागर प्रतिनिधी**
**हिवरखेड,( दि.10 )** - महात्मा फुले हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालयात 6 डिसेंबर रोजी डॉ .बाबासाहेब आंबेडकर यांचा महापरिनिर्वाण दिन साजरा करण्यात आला. या प्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्या दातीर, प्रमुख उपस्थिती नंदा थोरात, पर्यवेक्षिका, प्रमुख पाहुणे प्रा.सुभाष पारीसे तसेच प्रा.अमोल इंगळे हे उपस्थित होते.

सर्वप्रथम पाहुणे मंडळींच्या हस्ते डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रतिमेचे पूजन व हारार्पण करण्यात आले. नंतर डॉ. बाबासाहेब यांच्या जीवन कार्यावर शाळेतील बरेच विद्यार्थ्यांनी आपले विचार मांडलेत. प्रा.पारीसे यांनी बाबासाहेबांनी शालेय जीवनातील कठीण समस्यांवर यशस्वीपणे केलेली मात, प्रचंड वाचनाची सवय, स्वत: वरील आत्मविश्वास, कर्तृत्वावर असीम श्रद्धा यामुळे ते राज्यघटनेचे शिल्पकार, भारतरत्न, विश्वरत्न बनले यांबाबत विचार पटवून दिलेत. प्रा.इंगळे यांनी बाबासाहेबांनी शिक्षणाचे महत्त्व पटवून देतांना तुमच्याकडे दोन रुपये असतील एक रुपयाची भाकरी आणि एक रुपयाचे पुस्तक घ्या, यामुळे तुम्हाला शरीराची भूक आणि चांगल्या विचाराची भूक सहज भागवता येईल हे पटवून दिले. थोरात यांनी बाबासाहेबांचा शिका, संघटित व्हा व संघर्ष करा हा मानव विकासाचा खरा मूलमंत्र पटवून दिला. कार्यक्रमाच्या अध्यक्षा दातीर यांनी डॉ.बाबासाहेबांचे विचार आजच्या पिढीने समजून घेवून आत्मसात करणे गरजेचे आहे, यातूनच समाजात समानता आपणास निर्माण करता येते हे समजावून सांगितले. या कार्यक्रमाचे संचालन व आभार प्रदर्शन संगीता सरदार यांनी केले. या कार्यक्रमाला शाळेतील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# कृउबा समीती तर्फे नवनियुक्त आ. गजानन लवटे यांचा सपत्नीक सत्कार



**महासागर प्रतिनिधी**
**अंजनगांव सुर्जी ( दि.10 )**- दर्यापुर मतदार संघाचे नवनियुक्त आमदार गजानन लवटे यांनी बुधवार दि.4 रोजी कृषी उत्पन्न बाजारसमीती येथे सहकार क्षेत्रातर्फे सपत्नीक सत्कार करण्यात आला. अंजनगांवसुर्जी च्या सहकार क्षेत्रातील कृषी ऊत्पन्न बाजारसमीती,ता.खरेदी वीक्री संघ, किसान जिनींग प्रेसींग व शारदा नागरीक पतसंस्था या संस्थेच्या माध्यमातून नवनियुक्त आमदार गजानन लवटे व त्यांचे सहचरणी ज्योती लवटे यांचा बाजारसमीतीच्या प्रांगणात सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणुन सहकारातील वरीष्ठ सदस्य हरीभाऊ बहीरे तर मंचकावरील प्रमुख उपस्थितीत बा.स.चे उप सभापती सुरेश राऊत, पंचायत समीतीचे माजी सभापती शिवाजी हरणे, कसबे गव्हाणचे सरपंच शशीकांत मंगळे, बाळासाहेब पोटे, महेंद्र दिपटे, बाळासाहेब हाटे,माजी उप सभापती प.स. महेश खारोळे, कपील देशमुख, खविस चे अध्यक्ष गजानन धोटे, किसान जिनींग चे सुबोध काळमेघ, महेंद्र साबळे, शारदा ढोक, पुनम पोटे होत्या. नव नियुक्त आमदार गजानन लवटे यांनी %कार्यरत सहकार बॉडी मधुनच माझा राजकीय श्रीगणेशा झाला असल्याने ही माझी राजकीय मातृसंस्था आहे. संस्थेच्या व सहकाराचे माझे सहर्कायांनी माझ्या केलेल्या सत्कारास शब्द नाहीत, माझ्यासाठी सहकारातुन व माझे सहकारातील सहर्कायांनी रांत्रदिवस जिवाचे रान केले.त्याबद्दल मी त्यांचा ऋणी आहे.सहकारातील लोकाभीमुख कामा करीता माझी दारे नेहमी उघडी राहतील असे सत्कारास उत्त्तर देताना विशद केले. सहकारातील व संस्थेच्या सभासद, संचालक, शेतकरी बाजारसमीतीचे व्यापारी, हमाल, मापारी यांचे उपस्थितीत झालेल्या सत्कार समारंभाचे स्वागताध्यक्ष कृषी उत्पन्न बाजारसमीतीचे सभापती अड. जयंत साबळे यांनी भुषविले तर कार्यक्रमाचे सुत्रसंचालन बाजारसमीतीचे संचालक विकास येवले यांनी तर आभार खविस च्या संचालीका अर्चना पखान यांनी केले.

# स्त्री च्या उत्कर्षासाठी शतकापूर्वीच संत गुलाबराव महाराजांचे योगदान!

## ह.भ.प.नयना बच्चू कडू | गुलाब गौरव कथेचे पाचवे पुष्प

**महासागर प्रतिनिधी**
**चांदुर बाजार,( दि.10 )**- शरीराने पुरुष व मनाने स्त्रीत्वाचा पूर्ण भाव आपल्या अंत:करणांमध्ये धारण करणारे व या जगतामध्ये स्त्री जीवनाच्या संपूर्ण उत्कर्षाकर्ता श्री गुलाबराव महाराजांचे शंभराव्या वर्षाच्या पूर्वीच अभूतपूर्व योगदान आहे.जेव्हा स्त्रीला चूल आणि मूल एवढाच दर्जा दिला जायचा तेव्हा गुलाबराब महाराजांनी स्त्री महत्व ओळखून स्त्री ही या जगाची जननी असून तीच तीचा सन्मान करण्याबाबतचे मत तेव्हा व्यक्त केले होते.माधान येथे सुरू असलेल्या गीता जयंती महोत्सवात गुलाब गौरव कथेच्या माध्यमातून हभप नयना बच्चू कडू यांनी आज पाचवे पुष्प गुंफले.

5 ते 12 डिसेंबर दरम्यान भक्तीधाम येथे सुरू असलेल्या गीता जयंती महोत्सवाच्या दरम्यान हभप नयना कडू यांनी संत गुलाबराव महाराज यांच्या अनेक सामाजिक पैलूंना भाविकांसमोर मांडले. श्री गुलाबराव महाराजांचे स्त्री विषयक विचार सांगत असताना स्त्रियांच्या जीवनामध्ये असणारा समतोल हा किती महत्त्वाचा आहे याचं उदाहरणासहित स्पष्टीकरण हभप नयना कडू यांनी आपल्या व्याख्यानांमध्ये केलेला आहे. कथा श्रवणाच्या भागांनी श्री गुलाबराव महाराजांच्या छोट्या छोट्या चरित्रात्मक कथांचा भावपूर्ण प्रवाह आपल्या उगवत्या वाणीमध्ये वर्णन करत असताना श्री गुलाबराव महाराजांचा प्रत्यक्ष अनुभव त्या ठिकाणी असणाऱ्या श्रोते वृंदांच्या चक्षुपटलावरती येत आहे.

तरुण मंडळींनी परमार्थ करताना कोणकोणते निर्णय विवेक बुद्धीने घ्यावे याचाही विचार सुद्धा नयना कडू यांनी व्यक्त केले. श्री



गुलाबराव महाराजांचा स्वमत निर्णय सारखा ग्रंथ ज्यामध्ये सूत्रात्मक पद्धतीने अनेक विषयांचे प्रतिपादन श्री गुलाबराव महाराजांनी संस्कृत भाषेमध्ये केलेला आहे. साधू बोध,भागवत, भक्ती, सौरभ, समीक्षा पत्र अशा अनेक ग्रंथांद्वारे श्री गुलाबराव महाराजांच्या सर्व विद्या वैभवाचे दर्शन हभप नयना कडू या आपल्या कथा भावामध्ये प्रगट करत आहे. भारतीय संस्कृती अचाट आणि वैज्ञानिक दृष्टिकोन ठेवणारी आहे याचा पुरस्कार सकलसंतांनी आपल्या साहित्य तपाच्या द्वारे या भू मंडळामध्ये प्रगट केलेला आहे. भारत हा देश पुरोगामी विचारांचा नाही तर तो प्रतीक्षणा वर्धमान या न्यायाने प्रत्येक वेळेस नावीन्यपूर्ण अशा चेतनेचा अविष्कार आहे.

यामध्ये स्त्रीच जीवन हे सर्वोत्तम आहे. म्हणून भारतीय संस्कृतीने स्त्रियांचा कधी अवमान केला नाही उलटपक्षी स्त्री सर्वतो परिबंधनीय आहे याचा पुरस्कार अनादी काळापासून गार्गी, मैत्री, सीता, द्रोपदी यासारख्या चरित्रांद्वारे ते प्रगट झालेले आहेत.

मध्यवर्गीय काळ जो स्त्री विषयांच्या संदर्भामध्ये नाना प्रकारचे शंका कुशंका प्रगट करते अशा शंकांच्याद्वारे स्त्री जीवनाच्या संदर्भातले संभ्रम या समाज मनातल्या अनेक लोकांच्या अंतकरणांमध्ये विंबवल्या गेले. प्रज्ञाचक्षु संत श्री गुलाबराव महाराजांनी या सर्व विषयांना पूर्णविराम देण्याकरिता स्वयम स्त्रीवेश धारण करून भक्ती तत्वातलं आणि प्रेम तत्वातलं निष्कलंक असे चरित्र स्त्रियांचच असू शकतं आणि ते समर्पित जीवन या जगतामध्ये भारतासारख्या देशाशिवाय अन्यत्र त्या ठिकाणी दिसत नाही. पतिव्रता धर्म आचरण धर्म आणि समर्पण धर्म या तीन गोष्टींमुळे अनेक पिढ्यांचे संस्करण करण्याचं दायित्व स्त्रियांमध्ये आहे.आणि हे त्यांचे सामर्थ्य कुशलतेने त्यांच्या स्वभावामध्ये नैसर्गिकरित्या आलेला आहे. वृद्ध मंडळी व आपल्या जीवनाच्या सर्व वहिवाटी पूर्ण करत अनुभवाच्या एका मार्गदर्शकाच्या भूमिकेमध्ये असणाऱ्यांनी काय करावे आणि काय करू नये या संदर्भातला उत्तम मार्गदर्शन प्रवचनाच्या द्वारे नयना कडू यांनी स्वत: त्या ठिकाणी दिले.

### महाराजांच्या सुक्ष्मातील सूक्ष्म चरित्राचे निरुपण

या प्रवचन व व्याख्यानासाठी स्त्रीवर्ग बहुसंख्येने उपस्थित होते तसेच पुरुषवर्ग सुद्धा अत्यंत एकाग्रतेने या कथेचा श्रवण करत आहे.श्री गुलाबराव महाराजांच्या चरित्र कथेचा हा प्रवाह प्रथमताच भक्तीधामच्या व्यासपीठावरती हभप नयना कडू यांच्या मुखाद्वारे प्रवाहित होत आहे. अनेकांनी श्री गुलाबराव महाराजांच्या सुक्ष्मातील सूक्ष्म चरित्रांचे वर्म मर्म जाणून घेण्याकरता आपल्या दैनंदिन जीवनातला वेळ काढून त्या ठिकाणी श्री महाराजांच्या कथा भावाला आपल्या अंतकरणात धारण केलेलं आहे.


## जाहीर सुचना

डॉ. संजय श्रीराम गरकल तहसिलदार अचलपूर यांचे कोर्ट
प्रकरण क्रमांक: जन्म नोंद क्रं. 59/ एम.आर.सी. 81/ परतवाडा / 2024-2025
अर्जदार: शगीर शाह तसलीम शाह
रा. गुलजार कॉलनी परतवाडा ता. अचलपूर जि. अमरावती
-विरुध्द-
**गैरअर्जदार:**- मुख्याधिकारी, जन्म व मृत्यू विभाग,
नगरपरिषद कार्यालय अचलपूर.

ज्याअर्थी उपरोक्त अर्जदार शगीर शाह तसलीम शाह रा. गुलजार कॉलनी परतवाडा ता. अचलपूर जि. अमरावती यांचा जन्म दिनांक 18/08/1976 रोजी परतवाडा, नगरपरीषद अचलपूर येथे झाला असून अर्जदार यांनी जन्म व मृत्यू अधिनियम कलम 13 (3) अन्वये सदर जन्माची नोंद होणेबाबत अर्ज या न्यायालयात सादर केला आहे.

त्याअर्थी, सदर अर्जाबाबत कोणाची हरकत असल्यास त्यांनी सदर जाहीर सुचना प्रसिध्द झाल्यापासून 30 दिवसाचे आत स्वत: जातीने अगर निर्दिष्ट केलेल्या वकीलांमार्फत तहसिल कार्यालय, अचलपूर येथे हजर राहावे. अन्यथा कोणाची कोणत्याही प्रकारची हरकत/आक्षेप नाही असे गृहित धरुन अर्ज निकाली काढण्यात येईल याची नोंद घ्यावी.

दिनांक :- 4/12/2024 करीता

शिक्का

**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अचलपूर**

## जाहीर सुचना

**डॉ. संजय श्रीराम गरकल तहसिलदार अचलपूर यांचे कोर्ट**
**प्रकरण क्रमांक :- जन्म नोंद क्रं. 60/एम.आर.सी.81/परतवाडा/ 2024-2025**
**अर्जदार:**- शाहाना परवीन शगीर शाह
रा. गुलजार कॉलनी परतवाडा ता.अचलपूर जि. अमरावती
-विरुध्द-
**गैरअर्जदार:**- मुख्याधिकारी, जन्म व मृत्यू विभाग,
नगरपरिषद कार्यालय अचलपूर.

ज्याअर्थी उपरोक्त अर्जदार शाहाना परवीन शगीर शाह रा. गुलजार कॉलनी परतवाडा ता.अचलपूर जि. अमरावती यांचे लग्नापुर्वीचे नाव कु. शाहाना बी यासीन शाह यांचा जन्म दिनांक 17/02/1982 रोजी परतवाडा, नगरपरीषद अचलपूर येथे झाला असून अर्जदार यांनी जन्म व मृत्यू अधिनियम कलम 13(3) अन्वये सदर जन्माची नोंद होणेबाबत अर्ज या न्यायालयात सादर केला आहे.

त्याअर्थी, सदर अर्जाबाबत कोणाची हरकत असल्यास त्यांनी सदर जाहीर सुचना प्रसिध्द झाल्यापासून 30 दिवसाचे आत स्वत: जातीने अगर निर्दिष्ट केलेल्या वकीलांमार्फत तहसिल कार्यालय, अचलपूर येथे हजर राहावे. अन्यथा कोणाची कोणत्याही प्रकारची हरकत/आक्षेप नाही असे गृहित धरुन अर्ज निकाली काढण्यात येईल याची नोंद घ्यावी.
दिनांक :- 4/11/2024

शिक्का

**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अचलपूर**

## जाहीर सुचना

**श्री. जगदीश मंडपे, निवासी नायब तहसिलदार अचलपूर तथा कार्यकारी दंडाधिकारी, अचलपूर यांचे न्यायालय जि. अमरावती**
**प्रकरण क्रमांक: जन्म नोंद क्रं ) 89 / एम.आर.सी.81/परतवाडा/2024-2025**
**अर्जदार:**- अरशीद खान रशीद खान
रा. मुगलाईपुरा, परतवाडा ता.अचलपूर जि. अमरावती
-विरुध्द-
**गैरअर्जदार:**- मुख्याधिकारी, जन्म व मृत्यू विभाग,
नगरपरिषद कार्यालय अचलपूर.

ज्याअर्थी उपरोक्त अर्जदार अरशीद खान रशीद खान रा. मुगलाईपुरा, परतवाडा ता.अचलपूर जि.अमरावती यांचा जन्म दिनांक 27/01/1983 रोजी परतवाडा, नगरपरीषद अचलपूर येथे झाला असून अर्जदार यांनी जन्म व मृत्यू अधिनियम कलम 13(3) अन्वये सदर जन्माची नोंद होणेबाबत अर्ज या न्यायालयात सादर केला आहे.

त्याअर्थी, सदर अर्जाबाबत कोणाची हरकत असल्यास त्यांनी सदर जाहीर सुचना प्रसिध्द झाल्यापासून 30 दिवसाचे आत स्वत: जातीने अगर निर्दिष्ट केलेल्या वकीलांमार्फत तहसिल कार्यालय, अचलपूर येथे हजर राहावे. अन्यथा कोणाची कोणत्याही प्रकारची हरकत/आक्षेप नाही असे गृहित धरुन अर्ज निकाली काढण्यात येईल याची नोंद घ्यावी.

दिनांक :- 3/12/2024

शिक्का

**निवासी नायब तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अचलपूर**